फौजदारी कि. अर्ज क्र. ९१/२०१९
रूतुजा वि. विजय
नि. क्र.२४ पुढे/
गैरअर्जदार तर्फे सा.क्र. १

**गैरअर्जदारा तर्फे साक्षदार क्र. १ चा सरतपास विधीज्ञ श्री बख्श यांच्यामार्फत**

**१.** मी विजय मदनराव गोरे शपथेवर सांगतो की, माझे सरतपासच्या शपथपत्रातील मजकूर माझे सांगण्याप्रमाणे बरोबर असून मी समजून उमजून त्यावर स्वाक्षरी केली. मी नि. क्र. २६ अन्वये खालील दस्तऐवजाची यादी दाखल केली आहे. खाली दाखल करित असलेल्या दस्तऐवजास निशाणी क्रमांक देण्यात येते.

१. माझी आई दि. ५.१२.२०१२ रोजी मरण पावली त्याबाबतचे मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र. २७** देण्यात येते.

२. कौटुंबीक न्यायालय पूणे येथे एच.एम.पी. क्र. ४०/२२ या प्रकरणातील अर्जदाराने दाखल केलेली खावटी मिळण्याबाबतच्या नि.क्र. २८ अर्जाची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे त्यास **नि.क्र. २८** देण्यात येते.

३. एच.एम.पी. क्र. ४०/२२ या प्रकरणातील अर्जदाराने हिंदु विवाह कायदयाचे कलम २४ अंतर्गत दाखल केलेल्या नि.क्र. २८ च्या अर्जाचे उत्तराची प्रमाणीत प्रत दाखल केले आहे त्यास **नि.क्र. २९** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास अर्जदारातर्फे श्रीमती मदान वकील यांच्यामार्फत**

२. मी इयत्ता बारावी नापास आहे. मला तीन बहीणी आणि एक भाउ आहे. माझया लग्नाला ८ वर्ष पूर्ण होत आहे. हे म्हणणे खरे आहे की माझया बहीणी आणि भाउ चे लग्न झाले आहेत. साक्षीदार सांगतो की माझा भाउ मरण पावला आहे. हे म्हणणे खरे आहे की माझया बहिणी विवाहीत असून त्या त्यांच्या घरी सासरी आहेत. हे म्हणणे खरे आहे की मी आता एकटा आणि स्वतंत्र आहे. मी घरे खरेदी विक्री संबंधी

ब्रोकर कडे नोकरी करतो. मी ऑल प्रॉपर्टी नावाच्या ब्रोकर कडे काम करतो. आम्ही दोघे दि. १८.०४.२०१९ पासून विभक्त राहत आहोत. साक्षीदार सांगतो की अर्जदार स्वत:हुन घर सोडून गेली.

३. हे म्हणणे खरे आहे की हिंगणघाट व पूणे येथील न्यायालयामध्ये दाखल असलेल्या प्रकरणामध्ये खावटीचा आदेश झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की लग्नामध्ये अर्जदाराच्या वडिलांनी मला टी.व्ही., फ्रीज व फर्निचर, सोन्याचा गोफ व इतर दागिने दिले. हे म्हणणे खरे नाही की सर्व दागिने माझयाकडे आहेत. हे म्हणणे खरे नाही की माझयाकडे स्वीफट डिझायर नावाची कार जिचा नोंदणी क्र. एम.एच.१२–युएमओ–१८१ आहे. हे म्हणणे खरे आहे की मी अर्जदाराला अजूनपर्यंत खावटी दिलेली नाही. मी अर्जदाराला प्रेमाने नांदविण्यास तयार होतो व अजूनही आहे म्हणून अर्जदाराला खावटी देण्यास पात्र नाही. हे म्हणणे खरे आहे की लग्नानंतर मुलांची व पत्नीची सांभाळण्याची जबाबदारी पतीची असते. हे म्हणणे खरे नाही की मी ती जबाबदारी पूर्ण केली नाही. हे मला माहीत नाही की माझया मुलगी सारक्षीच्या शिक्षणाचा खर्च अर्जदार करीत आहे किंवा कसे.

४. अर्जदाराचे बी.एड. पर्यंत शिक्षण झाले आहे याबाबतचे कोणतेही दस्तऐवज मी अभिलेखावर दाखल केले नाही आहे. हे म्हणणे खरे नाही की अर्जदाराचे बी. एड. पर्यंत शिक्षण झाले नाही त्यामुळे मी ते अभिलेखावर तसे दस्तऐवज दाखल केले नाही.

५. सन २०१९ पासून अर्जदाराचे पालनपोषण तिचे आई वडील करीत आहे हे मला माहीत नाही.

**प्रश्न** सन २०१९ पासून तुम्ही अर्जदाराचे पालनपोषणाची जबाबदारी पूर्ण केली नाही ?

**उत्तर** अर्जदार माझयासोबत राहत नसल्यामुळे तिच्या पालनपोषणाची जबाबदारी मी पूर्ण करू शकलो नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, माझया मुलीचे ॲडमिशन मी

केंद्रीय विद्यालय, पूणे क्रमांक ३ येथे केले होते.

६. माझयाकडे आय. स्मार्ट दुचाकी गाडी आहे. हे म्हणणे खरे नाही की मी अर्जदाराला तिचे आई वडिलांना मारण्याची धमकी देत होतो. हे म्हणणे खरे नाही की दि. १०.११.२०२२ रोजी रात्री ११.२० वाजता अर्जदाराला संदेश पाठवून तूझे माय बाप आणि भाउ कोणालाही सोडणार नाही, हे माझया हीटलीस्ट वर आहे असे म्हटले होते. हे म्हणणे खरे नाही की मी अर्जदाराला तु लठ्ठ आहे व तू दिसायला सुंदर नाही असे म्हणत होतो. हे म्हणणे खरे नाही की मी सारक्षी टुर्स आणि टॅव्हलस नावाने व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे नाही की दि. १८.०९.२०२२ रोजी रात्री १२.३२ वाजता मी अर्जदाराला सारक्षी टुर्स आणि टॅव्हल्स ही सुरू केली आहे असा संदेश पाठविला होता. हे म्हणणे खरे नाही की मी अर्जदाराला दि. १३.०९.२०२२ रोजी दुपारी ४.१६ वाजता 'तू जी डी. व्ही. ची केस केली आहे ती तू हरणार आहे' असा संदेश केला होता. हे म्हणणे खरे नाही की मी अर्जदाराला दि.९.११.२०२२ रोजी दुपारी २.५० वाजता 'मी जे म्हणतो, ते करून दाखवितो हा माझा स्वभाव' असा संदेश पाठविला होता. हे म्हणणे खरे नाही की दि. १५.१०.२०२२ रोजी दुपारी २.१३ वाजता मी अर्जदाराला 'नागपूरात तुझया मागे जासुसी लावले आहे प्रुफ साठी' असा संदेश केला होता. हे म्हणणे खरे नाही की मी अर्जदाराला 'या कहानीचा शेवट खूप भयानक होईल फक्त जाणीव ठेव, तू किंवा मी एकच राहणे जरूरीचे आहे, तुझा गेम आता संपवीलाच पाहीजे, तूला चॅलेंज आहे तुला घटस्फोट ही देत नाही, दुसरे लग्न ही करून दाखवितो, मी काही झुकणार नाही तुझयापुढे आणि तुझयापुढे झुकायला मी काही मुर्ख नाही, तुझा विचार करणे मी सोडले, तू कितीही गांड पटकली तरी घटस्फोट देत नाही आणि होत नाही, घेतला २ बी.एच.के. फलॅट माझया साठी मुद्दाम कुणाल च्या नावा वर केला उद्या तोच वारीस आहे, सारक्षी ची नवीन इर्टीका मन्डे ला बुक होणार मी पुण्यात पोहचल्यावर, घटस्फोटचे सपने बघ तो

होत नसतो पैसे ही भेटत नाही, जे बोलतो ते करून दाखवतो हा माझा स्वभाव, तुझा बाप लवकर मरो हीच ईश्वरचरणी प्रार्थना अशी धमकी देत होतो, तु कोठे आभाळात जरी गेली तरी शोधून काढेल, आता तुझी कोर्टात जिरवणार, आता उलटी गिनती सुरू कर, चंदया पळाला घाटातून, तोंड लपवून पळाला चंदु, सायंकाळ बसून काय केले भेटले घंटा असे संदेश वेगवेगळया तारखेला केले होते. हे म्हणणे खरे नाही की मी अर्जदार ही घाबरली पाहिजे म्हणून खराब मॅसेज करीत असतो.

७. हे म्हणणे खरे नाही की मी सारक्षी रियल इस्टेट या नावाचा ब्रोकर चा व्यवसाय करतो.

**प्रश्न** तुम्ही तुमच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ४ मध्ये नमुद केलेले लग्न कोणाचे होते हे सांगु शकतात का ?

**उत्तर** अर्जदाराने मला आरतीच्या नातेवाईकाचे लग्न होते असे सांगितले होते त्यामुळे मी अर्जदाराला सखोल चौकशी केली नाही.

**प्रश्न** आरतीचे पूर्ण नाव माहीत आहे काय ?

**उत्तर** आरती यांच्या माहेरचे नाव कोहरे होते आणि त्यांच्या सासरचे नाव मसाळकर होते.

**प्रश्न** तुम्ही ती लग्नाची पत्रीका दाखल करू शकतात का

**उत्तर** घटना चार वर्षापूर्वीची आहे माझया घरी जर पत्रीका मिळाली तर मी ती न्यायालयात दाखल करील.

८. हे म्हणणे खरे नाही की परिच्छेद क्र. ४ मधील मजकूर खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझया शपथपत्रातील परिच्छेद क्र. ३ मधील मजकूर खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी अर्जदाराला तुझया आई वडिलांनी लग्नामध्ये काहीच दिले नाही, तुझया वडिलांनी शेत विकली तर तुला त्यातील काहीच हिस्सा दिलेला नाही, तू तुझया वडिलांच्या संपत्तीत हिस्सा माग,

माझया मुलीला (सारक्षी) पण काहीच दिले नाही असे म्हणून अपमानीत करीत असे व अपशब्दात शिवीगाळ करीत असे. हे म्हणणे खरे नाही की मी अर्जदाराला तुझया वडीलांनी टी.व्ही., फ्रीज, बेडरूम सेट, दिवाण, कपाट, ड्रेसिंग टेबल, किचन मधील सर्व भांडे, बाईक या सर्व वस्तु पुण्यात राहत असतांना दिल्या तरीपण मी सर्व वस्तु तुझया घरच्यांनी वापरलेल्या दिल्या आहे यावरून नेहमी तिला अपमानीत करीत असे.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

माझ्या समक्ष, श्रवणोत्तर स्विकृत,

दि. १९.११.२०२२

**(दिपक रु. बोर्डे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
न्यायालय क्र. ४, हिंगणघाट.